# ई) जनसंपर्क व प्रसिध्दी विभाग

## १. बाजार समिती पदाधिकारी/अधिकारी प्रशिक्षण

राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांचे पदाधिकारी आणि अधिकारी कृषि पणन मंडळाने स्थापन केलेल्या राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था, तळेगाव दाभाडे , जि. पुणे या संस्थेत प्रशिक्षण देण्याचे काम कृषि पणन मंडळामार्फत करण्यात येत आहे. अहवाल वर्षात झालेल्या प्रशिक्षण कार्यक्रमांचा तपशील खालीलप्रमाणे :

| अ.क्रं. | दिनांक | कोणासाठी | संख्या |
|---|---|---|---|
| १. | १६ ते २० एप्रिल २०१२ | बाजार समितीचे सचिव | ७ |
| २. | २१ ते २५ मार्च २०१२ | बाजार समितीचे सचिव | ९ |
| ३ | ९ ते १३ जुलै | बाजार समितीचे सचिव | ४ |
| ४ | ३० जुलै ते ३ ऑगस्ट २०१२ | बाजार समितीचे सचिव | १ |
| ५ | ६ ते १० ऑगस्ट २०१२ | बाजार समितीचे सचिव | २ |
| ६ | २० ते २४ ऑगस्ट २०१२ | बाजार समितीचे सचिव | १० |
| ७. | १० ते १४ डिसेंबर २०१२ | बाजार समितीचे सचिव | ६ |
| ८. | १५ ते १९ जानेवारी २०१३ | बाजार समितीचे सचिव | २ |
| ९ | ४ ते ८ मार्च २०१३ | बाजार समितीचे सचिव | १ |
| १० | १८ चे २२ मार्च २०१३ | बाजार समितीचे सचिव | ४ |

## २. "कृषि पणन मित्र " मासीक

कृषि पणन मंडळामार्फत दर महिन्यास, कृषि पणन मित्र मासिक प्रसिध्द करण्यात येते.सदरचे मासिक प्रत्येक महिन्यास वर्गणीदार,कृषि उत्पन्न बाजार समिती, सहाय्यक निबंधक, जिल्हा उपनिबंधक, विभागीय सहनिबंधक, तालुका खरेदी- विक्री संघ, फळे व भाजीपाला उत्पादक सहकारी संस्था, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, विभागीय कृषि अधिकारी, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, जिल्हा परिषदा, पणन मंडळाचे संचालक मंडळ, मंत्रीमंडळ, मंत्रालयीन सचिव, वृत्तपत्रे, कृषि मासिके, इत्यादींना पाठविण्यात येते. अंकाचे जास्तीतजास्त वर्गणीदार करणेसाठी अंकाचे जास्तीत जास्त वर्गणीदार करणेसाठी पाठपुरावा करण्यात येत आहे.

सदर मासिकामध्ये, कृषि उत्पादन, पिक संरक्षण, कृषी क्षेत्रातील उच्च तंत्रज्ञान, पाणी व्यवस्थापन, बी-बियाणे, प्रक्रिया उद्योग, पणन व निर्यात केंद्रे व राज्य शासनाच्या विविध योजना, सुगी पश्चात तंत्रज्ञान, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय, इ. विषयांवर तज्ञांचे लेख प्रसिध्द करण्यात येत असतात. कृषी पणन मित्र मासीकाचे सुमारे ३ लाख वाचक आहेत.

## ३. प्रदर्शन सहभाग

कृषी पणन मंडळाच्या विविध योजना, प्रकल्प, उपक्रम आणि कार्यक्रम यांची माहिती राज्यातील शेतक-यांना व्हावी व याचा फायदा जास्तीत जास्त शेतक-यांनी करुन घेण्याच्या दृष्टिकोनातून याबाबतची माहिती विविध प्रदर्शनामध्ये सहभागी होवून कृषी पणन मंडळातर्फे संबंधितांना देण्यात येते. तसेच सदर प्रदर्शनामध्ये कृषी पणन मित्र मासिकाचे जास्तीत जास्त वर्गणीदार करुन घेण्याचे प्रयत्न करण्यात येतात. चालू अहवाल वर्षात मंडळ खालील प्रदर्शनामध्ये सहभागी झाले.

| अ.क्रं. | दिनांक | प्रदर्शनाचे नाव | ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | २४ ते २८ नोव्हेंबर १२ | कृषि औद्योगिक व पशूपक्षी प्रदर्शनाबाबत | कराड, जि.सातारा |
| २ | ४ ते ७ जानेवारी १३ | ग्लोबल कोकण भूमी प्रतिष्ठान | गोरेगाव (पू), मुंबई |
| ३ | १ ते ५ डिसेंबर १२ | ॲग्री एक्सपो १२ | ॲग्रीकल्चरल ग्राउंड,पुणे |
| ४ | १४ ते १८ डिसेंबर १२ | किसान १२ | मोशी, जि. पुणे |

## ४. जाहिरात व आर्थिक मदत

| अ.क्रं. | संस्थेचे नांव / मासिकाचे नांव | रक्कम रु. |
|---|---|---|
| १ | शेतकरी योध्दा (मासिक) | १६,२००/- |
| २ | मराठा चेंबर ऑफ कॉमर्स (वार्षिक डिरेक्टरी) | ५,९९७/- |
| ३ | अपेडा डिरेक्टरी | ४,३००/- |
| ४ | बळीराज मराठवाडा (विशेषांक) | ५,०००/- |
| ५ | कराड कृषि औद्योगिक व पशूपक्षी प्रदर्शनाबाबत | ५,०००/- |
| ६ | प्रेसिजन फार्मिंग टेक्नॉलॉजी फॉर बनाना (राहुरी) | १५,०००/- |
| ७ | इंडस्ट्री ॲन्ड ॲग्री. कॉन्फरन्स | ५,००,०००/- |

## ५. प्रसिध्दी

कृषि पणन मंडळातर्फे विविध प्रकारच्या कार्यशाळा, प्रदर्शन, चर्चासत्र, इतर अनुषंगिक कार्यक्रम व पत्रकार परिषद आयोजित केल्या जातात. मा. अध्यक्ष कृषि पणन मंडळ यांच्या पत्रकार परिषद, प्रेसनोट तसेच इतर प्रसिध्दीचे कामकाज करण्यात येते.

## ६. लेख प्रसिध्दी

कृषी पणनाशी संबंधित माहिती शेतकरी सहकारी संस्था, शास्त्रज्ञ, अधिकारी, पदाधिकारी, विस्तार कार्यकर्ते यांचेपर्यंत पोहोचविण्यासाठी कृषि पणन मंडळ सतत प्रयत्नशील आहे. कृषि पणनशी संबंधीत माहितीवर आधारीत विविध लेख अहवाल वर्षात कृषि पणन मित्र मासिकामध्ये प्रसिध्द करण्यात आले असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे ;

| अ.क्र. | लेखाचे नाव | कालावधी |
|---|---|---|
| १. | द्राक्ष प्रक्रिया पदार्थ | एप्रिल २०१२ |
| २. | कोरडवाहू फळांवर प्रक्रिया | एप्रिल २०१२ |
| ३. | कडधान्य काढणीपश्चात तंत्रज्ञान | एप्रिल २०१२ |
| ४. | महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ मधील नियमन रद्द करणे. | एप्रिल २०१२ |
| ५. | हायड्रोपोनिक तंत्रज्ञान भारतीयांकरिता | एप्रिल २०१२ |
| ६. | कृषि व्यवसाय व्यवस्थापन काळाची गरज | मे २०१२ |
| ७. | हिरवी मिरची प्रक्रिया | जून २०१२ |
| ८. | फळप्रक्रिया पदार्थ टिकविण्याचे तंत्रज्ञान | ऑगस्ट २०१२ |
| ९. | भारतातील कृषि विपणन व्यवस्था दोष व सरकारी प्रयत्न | ऑगस्ट २०१२ |
| १०. | शेतक-यांच्या पोरांनो, विक्रीकला शिका | सप्टेंबर २०१२ |
| ११. | बहुउद्देशीय गवार डिंक | ऑक्टोबर २०१२ |
| १२. | आवळा प्रक्रिया लघुउद्योग | नोव्हेंबर २०१२ |
| १३. | कृषी क्षेत्रासाठी फायदेशीर नॅनो तंत्रज्ञान | नोव्हेंबर २०१२ |
| १४. | फुलांच्या निर्यातीचे व्यवस्थापन | नोव्हेंबर २०१२ |
| १५. | विदेशी भाजीपाल्यातील ऋषिकेश | नोव्हेंबर २०१२ |
| १६. | काजूपासून तेल निर्मिती एक किफायतशीर पर्याय | डिसेंबर २०१२ |
| १७. | मोसंबी काढणी पश्चात तंत्रज्ञान | डिसेंबर २०१२ |
| १८. | उर्जा निर्मिती : गॅसिफायरद्वारे जैव पदार्थापासून विद्युत निर्मिती | डिसेंबर २०१२ |
| १९. | फळांची पॅकिंग, साठवण व प्रक्रिया | जानेवारी २०१३ |
| २०. | डिहायड्रेशन म्हणजे वाळवण | जानेवारी २०१३ |
| २१. | सौर फोटोव्होल्टाईक विद्युत कुंपण | जानेवारी २०१३ |

| अ.क्र. | लेखाचे नाव | कालावधी |
|---|---|---|
| २२. | कृषिमालाच्या निर्यातीकरिता फायटोसॅनिटरी प्रमाणपत्र देण्याची सुविधा | जानेवारी २०१३ |
| २३. | अंजिर प्रक्रिया | फेब्रुवारी २०१३ |
| २४. | द्राक्ष प्रक्रिया युक्त पदार्थ | फेब्रुवारी २०१३ |
| २५. | आवळा प्रक्रिया : महिलांसाठी एक किफायतशीर घरगुती व्यवसाय | फेब्रुवारी २०१३ |
| २६. | प्रक्रिया उद्योग – विभागनिहाय संधी व वाव | फेब्रुवारी २०१३ |
| २७. | अन्न आणि फळ प्रक्रिया उद्योग : काल – आज - उद्या | फेब्रुवारी २०१३ |
| २८. | चिकू : काढणी पश्चात तंत्रज्ञान | मार्च २०१३ |
| २९. | फुलांची पणन व्यवस्था – एक दृष्टिक्षेप | मार्च २०१३ |
| ३०. | कृषि मालावरील प्रक्रिया तंत्रज्ञान | मार्च २०१३ |
| ३१. | श्वेत क्रांतीचा जनक – डॉ. वर्गीस कुरीयन | मार्च २०१३ |
| ३२. | शेतीचे भविष्य बदलण्यासाठी चांगल्या यशोगाथा हव्यात | मार्च २०१३ |

## ७. दूरदर्शन आणि आकाशवाणी कार्यक्रमात सहभाग

कृषि पणन मंडळ दूरदर्शन मुंबई व पुणे, आकाशवाणी पुणे केंद्राच्या ग्रामीण कार्यक्रम सल्लागार समितीचे सदस्य आहे. दूरदर्शन केंद्र पुणे व मुंबई, आकाशवाणी पुणे केंद्रावरुन तसेच इतर आकाशवाणी केंद्रावरुन कृषि पणन मंडळाचे विविध कार्यक्रम, योजना, उपक्रम, यांची माहिती तसेच शेतक-यांना कृषि तंत्रज्ञानाची माहिती होण्याच्या दृष्टिकोनातून पणन मंडळाच्या तज्ञांचे कार्यक्रम प्रसारीत करण्यात येतात. तसेच प्रत्येक तिमाहीसाठी विषय आणि तज्ञांची नावे कळविण्यात येतात. या कार्यक्रमांमुळे शेतक-यांना कृषि पणन मंडळाच्या योजना व कृषि विषयक मार्गदर्शन मिळण्यास मोठ्या प्रमाणावर मदत झालेली आहे.

## ८. पुस्तकांचे प्रकाशन

वार्षिक अहवाल वर्षात कृषि पणन योजना, फार्मर डिरेक्टरी, पणन दैनंदिनी या पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले.

## ९. ग्रंथालय

कृषि पणन मंडळातील अधिकारी / कर्मचारी तसेच पणन मंडळाशी संबंधित सर्व संस्था, तज्ञ, शास्त्रज्ञ, विस्तार कार्यकर्ते, पदाधिकारी यांना कृषी, पणन, आयात, निर्यात,तंत्रज्ञान, नवीन संशोधन इ. बाबतची नवनवीन माहिती / संशोधन/ जागतिक घडामोडी समजाव्यात, त्याचा तपशिल प्राप्त व्हावा यासाठी ग्रंथालय सुरु

करण्यात आले आहे. ग्रंथालयात विविध विषयांवरील पुस्तके, संशोधनपर मासिके, अहवाल, सी. डी., प्रकल्प अहवाल इ. उपलब्ध असून त्यांचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे.

तसेच दरवर्षी विविध विषयांवरील पुस्तके ग्रंथालयात येत असून कृषि पणन, निर्यात इ. विषयांवरील राष्ट्रीय आणि आतंरराष्ट्रीय स्तरावरुन प्रसिध्द होणारी मासिके, त्रैमासिके, नियतकालिके ग्रंथालयात येतात.

**ग्रंथालयातील पुस्तकांची सद्यस्थिती**

एकूण पुस्तके : ३,७९०

मासिके : मराठी - १० व इंग्रजी - ६

ग्रंथालय नवनवीन पुस्तकांची खरेदी करुन अधिकाधिक माहितीपूर्ण आणि आधुनिक करण्याचा सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहे. तसेच विविध विषयांवरील वृत्तपत्रांमध्ये / मासिकांमध्ये प्रसिध्द झालेल्या लेखांचे विषयावार संकलन ग्रंथालयात करण्यात येते. इंटरनेटवरुनही विविध विषयांवरील माहिती आवश्यकतेनुसार पणन मंडळातील अधिका-यांना उपलब्ध करुन देण्यात येते. ग्रंथालय विभागामार्फत मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अॅन्ड अॅग्रीकल्चर इ. विविध संस्थांचे सभासदत्व प्राप्त करुन घेण्यात आले आहे. ग्रंथालयात दररोज १५ दैनिके येत असून या दैनिकांमधून विविध विषयांवरील कात्रण काढून त्यांचेही विषयावर संकलन करण्यात येते.